20 OCT 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

'सहकार'च्या प्रगतीसाठी तंत्रज्ञानाचा वापर करा

संजय पाचपोर : शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर, ता. १९ : सहकाराचा अभ्यास करून प्रत्येकाने किमान एका सहकारी संस्थेचा सभासद व्हावे. सहकार क्षेत्राच्या प्रगतीसाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा, असे आवाहन सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटनमंत्री संजय पाचपोर यांनी केले.

गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र, अर्थशास्त्र विभाग, वाणिज्य व व्यवस्थापन विभाग आणि एमबीए विभागातर्फे 'सहकाराद्वारे सर्वसमावेशक शाश्वत विकास' या विषयावरील विद्यापीठातील व्याख्यानात संजय पाचपोर बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. आर. के. कामत, तर प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, अधिसभा सदस्य संजय परमणे उपस्थित होते.

सहकार क्षेत्र हे सर्वसमावेशक विकासाचे एक सिद्ध झालेले मॉडेल असल्याचे कुलगुरू डॉ. कामत यांनी सांगितले. त्यांनी यशस्वी सहकारी व्यवस्था ही संस्कार, मानवी मूल्यांवर आधारित आहे, या लक्ष्मणराव इनामदार यांच्या विचाराची आठवण करून दिली. डॉ. सुभाष कोंबडे यांनी प्रास्ताविक केले. शामल पवार यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात व्याख्यानावेळी संजय पाचपोर यांचे स्वागत करताना कुलगुरू डॉ. आर. के. कामत. यावेळी शेजारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 OCT 2026 पुढारी

अन्नाची नासाडी टाळा, गरजूंना अन्न द्या

शिवाजी विद्यापीठात जागतिक अन्न दिन साजरा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीमधील फूड टेक्नॉलॉजी विभागातर्फे जागतिक अन्न दिन उत्साहात साजरा करण्यात आला. 'आजचे नावीन्य, उद्याचे पोषण' या संकल्पनेवर आधारित कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी अन्नसुरक्षा, पोषण आणि अन्नाची नासाडी टाळण्याबाबत जनजागृती केली.

कार्यक्रमाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते झाले. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रभारी संचालक प्रा. डॉ. अजित कोळेकर आणि विभाग समन्वयक डॉ. इराण्णा उडचाण उपस्थित होते. प्रत्येकाने गरजेपुरतेच अन्न घ्यावे, अन्नाची नासाडी टाळावी आणि शिल्लक असलेले चांगल्या स्थितीतील अन्न गरजूंना द्यावे, असे आवाहन कुलगुरू प्रा. कामत यांनी केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीमधील फूड टेक्नॉलॉजी विभागातर्फे आयोजित जागतिक अन्न दिन कार्यक्रमप्रसंगी कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी. (छाया : पप्पू अत्तार)

प्र-कुलगुरू प्रा. जाधव यांनी अन्न तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान आणि पौष्टिक अन्ननिर्मितीतील संशोधनाच्या संधी अधोरेखित केल्या. कुलसचिव डॉ. शिंदे यांनी संतुलित आहार, पाणीबचत आणि नैसर्गिक साधनसंपत्तीच्या योग्य वापराचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमात पोस्टर सादरीकरण, पौष्टिक खाद्यपदार्थ निर्मिती, प्रश्नमंजुषा, रील निर्मिती आणि व्यावसायिक संकल्पनांचे सादरीकरण झाले. खाद्य मेळाव्यालाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रा. मारिया बागवान यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 OCT 2026
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आयोजित जिल्हास्तरीय 'आविष्कार संशोधन' स्पर्धेतील प्रकल्पांचे परीक्षण करताना डॉ. आसावरी जाधव, राहूल माने, संतोष कांबळे.

आंब्याच्या कोयीची कॉफी, कडधान्यांची डायट पावडर

कॉलेज ऑफ नॉन-कन्वेंशनलमध्ये आविष्कार स्पर्धा

कोल्हापूर, ता. १९ : आंब्याच्या कोयीपासून बनविलेली कॉफी, कडधान्यांची डायट पावडर, वाहतुकीचे नियंत्रण करणारे स्मार्ट सेन्सरचे सिग्नल असे विविध संशोधन प्रकल्प विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेत मांडले.

शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ आणि सायबर ट्रस्ट संचलित कॉलेज ऑफ नॉन-कन्वेंशनल व्होकेशनल कोर्सेस फॉर वुमेन कोल्हापूरतर्फे आविष्कार संशोधन स्पर्धा घेण्यात आली. उद्घाटन विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. एस. जी. घाणे, आविष्कारचे समन्वयक डॉ. पी. के. पवार, महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. मानव्यविद्या भाषा आणि ललित कला, वाणिज्य व्यवस्थापन आणि कायदा, विज्ञान, कृषी आणि पशुधन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, वैद्यकीय आणि औषध निर्माण या सहा विभागांत जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील एकूण ४११ विद्यार्थ्यांनी त्यांचे नावीन्यपूर्ण संशोधन प्रकल्प सादर केले. त्यात आयओटी बेस्ड स्मार्ट डिस्टबिन, कोरफडीपासून पर्यावरणपूरक सौंदर्य प्रसाधने, आदी संशोधन प्रकल्पांचा समावेश होता.

डॉ. राहुल माने, आसावरी जाधव, संतोष कांबळे, संग्राम पाटील, इराण्णा उडचण आर्दींनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

20 OCT 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

आयडियाज् टुडे, इनोव्हेशन्स टुमारो

विद्यापीठात 'नॅनोस्पार्क' उपक्रम; विद्यार्थ्यांमधील संशोधन गुणांना प्रेरणा

कोल्हापूर, ता. १९ : विद्यार्थ्यांमधील संशोधनगुणांना प्रेरणा देण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँण्ड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागातर्फे 'आयडियाज टुडे, इनोव्हेशन्स टुमारो, इम्पॅक्ट फौरेव्हर' या घोषवाक्यासह 'नॅनोस्पार्क' विशेष संशोधन उपक्रम राबविला.

'आविष्कार' संशोधन स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर 'इग्नायटिंग यंग माइंड्स फॉर आविष्कार' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमात ७५ संशोधक विद्यार्थ्यांनी नावीन्यपूर्ण वैज्ञानिक प्रकल्पांचे सादरीकरण केले. पाच वैज्ञानिक मॉडेल्स आणि २६ वैज्ञानिक पोस्टर्स यांचा समावेश होता.

या वैज्ञानिक सादरीकरणासाठी एकूण सहा विद्याशाखांमधील विषय होते. यात पदवीस्तरीय, पदव्युत्तर आणि पीएच.डी.स्तरीय संशोधक विद्यार्थ्यांनी भाग घेतला. विद्यार्थ्यांच्या संशोधन सादरीकरणाचे राष्ट्रीयस्तरावरील शास्त्रज्ञांकडून मूल्यांकन व परीक्षण केले. त्यासाठी पुण्याच्या सीएसआयआर-राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा येथील शास्त्रज्ञ डॉ. बाबूल प्रसाद, जे. नित्यानंदन, प्रकाश वाडगावकर उपस्थित होते. 'आविष्कार'चे समन्वयक डॉ. पंकज पवार यांनी परीक्षक म्हणून काम केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. किरणकुमार शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.



शिवाजी विद्यापीठ : शास्त्रज्ञ डॉ. बाबुल कुमार, जे नित्यानंदन, प्रकाश वडगावकर यांच्यासमवेत 'नॅनोस्पार्क' या संशोधन उपक्रमात सहभागी झालेले संशोधक विद्यार्थी.

आठ जणांना पुरस्कार

उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या आठ जणांना पुरस्कार, प्रमाणपत्र देऊन गौरविले. यात सहारा पटेल, तन्मयी पाटील, अंकित कुमार, तन्वी वडनाल, अंजली मायने, पूर्वा खरात, कावेरी पुजारी, समृद्धी गावडे, प्रज्ज्वल पाटील, लंगम्बा थानओजम, प्रणव कांबळे यांचा समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 OCT 2026 पुढारी

मानसिक आरोग्य दिनानिमित्त विद्यापीठात जनजागृती

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ मानसशास्त्र अधिविभाग व व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मानसिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून मानसिक आरोग्य सप्ताह, जनजागृती रॅली व पथनाट्य आयोजित करण्यात आले.

मानसशास्त्र अधिविभागात पोस्टर प्रदर्शनाने करण्यात आली. पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी व समुपदेशन केंद्राच्या समन्वयक डॉ. विनिता रानडे यांनी केले. याप्रसंगी मानसशास्त्र अधिविभागाच्या विभागप्रमुख डॉ. प्रतिमा पवार उपस्थित होत्या. मानसिक जनजागृती रॅलीचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी मान्यवरांसमोर 'अपेक्षांचे ओझे, नैराश्याचा विळखा' हे पथनाट्य सादर केले. कार्यक्रमासाठी समुपदेशक उर्मिला शुभंकर, सत्यजित देसाई, मानसशास्त्र विभागाच्या प्र. विभागप्रमुख डॉ. प्रतिमा पवार, अधिविभागाचे डॉ. साक्षी गावडे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 OCT 2026
सकाळ

'देवचंद'मध्ये संशोधन पद्धतीवर कार्यशाळा

नानीबाई चिखली : देवचंद कॉलेज, अर्जुननगर (ता. कागल) येथील वरिष्ठ इंग्रजी विभागामार्फत सामंजस्य करार अंतर्गत 'संशोधन पद्धती' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा झाली. शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. इंग्रजी अभ्यासक्रमामध्ये संशोधन पद्धती आणि संशोधन प्रकल्प लेखन यांचा समावेश केलेला आहे. त्या अनुषंगाने कार्यशाळेचे आयोजन केले. प्रभारी प्राचार्य डॉ. रमेश साळुंखे अध्यक्षस्थानी होते. कार्यशाळेत आण्णासाहेब डांगे महाविद्यालय हातकणंगले येथील प्रा. डॉ. दिगंबर कुलकर्णी यांनी इंग्रजी भाषाशास्त्र संशोधन पद्धती यावर विवेचन केले. कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, इस्लामपूर येथील डॉ. बळीराम सावंत यांनी इंग्रजी साहित्य संशोधन पद्धती यावर विचार मांडले. इंग्रजी विभागप्रमुख डॉ. आनंदी कांबळे यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख प्रा. बी. जी. पाटील यांनी करून दिली. कार्यशाळेसाठी सहा महाविद्यालयाचे विद्यार्थी तसेच प्रा. स्मिता पाटील, डॉ. दीपा मडिवाल, प्रा. वनिता कांबळे उपस्थित होते. प्रा. विनायक बरुरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. ज्योती बुवा यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 OCT 2026

पुढारी

शिवाजी विद्यापीठात विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात हिंदी दिनानिमित्त आयोजित विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ झाला. हिंदी विभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे यूको बँकेचे शाखा व्यवस्थापक उदित घई उपस्थित होते.

एकपात्री प्रयोग स्पर्धेत महावीर कॉलेजच्या कार्तिकी गुरवने प्रथम क्रमांक मिळविला. शॉर्ट फिल्म मेकिंग स्पर्धेत 'वर्तमान राजनीति और युवा' हिंदी विभागाच्या चित्रपटाने प्रथम क्रमांक पटकावला. निबंध लेखन स्पर्धेत कमला कॉलेजच्या गायत्री माने, शीतल चौगले यांनी प्रथम क्रमांक मिळविला. काव्यवाचन स्पर्धेत कमला कॉलेजच्या सेजल गाडवे व शीतल चौगले यांनी प्रथम क्रमांक पटकावला. परीक्षक अनमोल कोठाडिया, अंकिता त्रिभुवने, डॉ. नरसिंग एकिले आणि संतोष कांबळे यांचा सत्कार करण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 OCT 2026

तरुण भारत

शिवाजी विद्यापीठात गुरुवारी जलतज्ज्ञ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील गांधी अभ्यास केंद्र, कॉ. दत्ता देशमुख अध्ययन व नेहरू अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी २२ रोजी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमात जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंग हे जल संवर्धनाच्या माध्यमातून विकास : महात्मा गांधी आणि अहिंसक विकास या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.